आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२९ नोव्हेंबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- छत्तीसगडमधे रायपूर इथं आयोजित करण्यात आलेल्या पोलीस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या परिषदेत प्रधानमंत्री भाग घेणार

- निलगिरी प्रकारातली तारागिरी युद्धनौका काल भारतीय नौदलाकडे सुपूर्द

- केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाच्या अध्यक्षपदी महसूल सेवेतले ज्येष्ठ अधिकारी विवेक चतुर्वेदी यांची नेमणूक

- श्रीलंकेत दितवाह चक्रीवादळामुळे मृतांचा आकडा ६९ वर पोहोचला असून, ३४ जण अजूनही बेपत्ता

- श्रीलंकेच्या मदतीसाठी भारताची ऑपरेशन सागर बंधू मोहीम

आणि

- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री श्रीप्रकाश जायस्वाल यांचं निधन

**<><><><><>**

छत्तीसगडमधे रायपूर इथं आयोजित करण्यात आलेल्या पोलिस महासंचालक आणि पोलीस महानिरीक्षकांच्या परिषदेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज आणि उद्या उपस्थित राहणार आहेत. परिषदेच्या विविध सत्रांचे अध्यक्षस्थान ते भूषवतील तसंच विशिष्ट सेवेसाठीची राष्ट्रपती पोलिस पदकं विजेत्यांना प्रदान करतील.

तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल झालं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, डीजीपी आणि आयजीपी परिषद देशाच्या अंतर्गत सुरक्षेच्या आव्हानांचे निराकरण करण्यासाठी प्रमुख व्यासपीठ उपलब्ध करुन देत आहे असं यावेळी गृहमंत्री म्हणाले. पुढील परिषदेपूर्वी देश पूर्णपणे नक्षलमुक्त होईल अशी ग्वाही शाह यांनी दिली.

**<><><><><>**

निलगिरी प्रकारातील तारागिरी युद्धनौका काल भारतीय नौदलाला सुपूर्द करण्यात आली. माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेड कंपनीनं तयार केलेली ती भारतीय बनावटीची तिसरी युद्धनौका आहे. वॉरशिप डिझाइन ब्युरोने या जहाजाची रचना केली आहे आणि मुंबईच्या वॉरशिप ओव्हरसीइंग टीमच्या देखरेखीत ते तयार झाले आहे.

भारतीय नौदलाच्या ताफ्यात ३३ वर्षे अखंड सेवा दिलेल्या आयएनएस तारागिरीचेच हे पुनर्निमाण आहे. आयएनएस तारागिरी हे जहाज १६ मे १९८० ते २७ जून २०१३ या कालावधीत नौदलाचा भाग होते.

<><><><><>

२०२६-२७ साठी आंतरराष्ट्रीय सागरी संघटना अर्थात IMO च्या परिषदेवर भारताची पुन्हा निवड झाली आहे. काल लंडन इथं झालेल्या IMO असेम्ब्लीच्या ३४व्या सत्रादरम्यान परिषदेच्या निवडणुका घेण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय सागरी व्यापारात सर्वाधिक सहभाग असलेल्या दहा देशांच्या श्रेणीमध्ये भारताला सर्वाधिक म्हणजे १६९ वैध मतांपैकी १५४ मते मिळाली. केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी या बद्दल आनंद व्यक्त केला. हा भारताच्या सागरी क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण असल्याचं त्यांनी म्हंटलं आहे. भारताला मिळालेली सर्वाधिक मतं ही जागतिक सागरी वाहतूक क्षेत्रामध्ये भारताच्या रचनात्मक नेतृत्वावर आंतरराष्ट्रीय समुदायाचा दृढ विश्वास दर्शवत असून हा निकाल म्हणजे भारत सरकारच्या शाश्वत सुधारणा आणि सागरी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी केलेल्या भविष्यकालीन उपक्रमांना सर्वमान्यता असल्याचं मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. IMO परिषदेमध्ये तीन श्रेणींमध्ये निवडून आलेले ४० सदस्य असतात आणि ते असेम्ब्लीच्या सत्रांदरम्यान आयएमओची कार्यकारी संस्था म्हणून काम करतात.

<><><><><>

एअरबस कंपनीच्या ए३२० मालिकेतल्या विमानांमध्ये सौर किरणोत्सर्गाच्या संभाव्य धोक्याची समस्या निर्माण झाली आहे. यामुळे उड्डाणांच्या नियंत्रणासंबंधीच्या डेटावर परिणाम होऊ शकतो. यामुळे एअरबसच्या सॉफ्टवेअरचे तात्काळ अद्ययावतीकरण करण्यात येत आहे. या प्रकारच्या विमानाला झालेल्या अपघातानंतर एअरबसनं हा आदेश जारी केला. देशात नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयानं एअरबस ए३२० प्रकारातल्या

सर्व विमानांचे उड्डाण रोखण्याचे आदेश तात्काळ लागू केले आहेत. भारतातील अनेक विमान कंपन्यांच्या उड्डाणांवर याचा परिणाम होणार आहे प्रवाशांनी त्यांच्या उड्डाणाविषयीची अद्ययावत माहिती कंपनीच्या संकेतस्थळावर तपासावी असं आवाहन विमान कंपन्यांनी केले आहे.

<><><><><>

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन उद्या हरियाणात कुरुक्षेत्र इथं भेट देणार आहेत.

कुरुक्षेत्र इथल्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेच्या २० व्या दीक्षांत समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. आंतरराष्ट्रीय गीता महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित अखिल भारतीय देवस्थान संमेलनाला देखील ते उपस्थित राहतील.

<><><><><>

केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाच्या अध्यक्षपदी महसूल सेवेतले ज्येष्ठ अधिकारी विवेक चतुर्वेदी यांची नेमणूक झाली आहे. ते१९९०च्या तुकडीतले अधिकारी असून  यापूर्वी त्यांनी महसूल गुप्तवार्ता संचालनालयात विविध पदांवर काम केलं आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने चतुर्वेदी यांच्या नेमणुकीचा प्रस्ताव मंजूर केला. सध्याचे अध्यक्ष संजय अग्रवाल उद्या सेवानिवृत्त होणार असून चतुर्वेदी त्यांचा कार्यभार घेतील.

<><><><><>

श्रीलंकेत दितवाह चक्रीवादळामुळे झालेल्या दुर्घटनांमधल्या मृतांचा आकडा ६९ वर पोहोचला असून, ३४ जण अजूनही बेपत्ता आहेत.  तिथल्या दोन लाखापेक्षा जास्त जणांना या वादळाचा फटका बसला असून, मदत आणि बचाव कार्य वेगानं सुरु आहे. या चक्रीवादळामुळे किनारपट्टी लगतच्या भागात ३०० मिली मीटरपेक्षा जास्त पाऊस झाला, तर ताशी ९० किलोमीटर वेगाने वारे वाहत असल्याचं तिथल्या अधिकाऱ्यांनी कळवलं आहे. परिणामी पूर, आणि भूस्खलनाच्या घटनांमुळे या क्षेत्रातली वाहतूक, वीज पुरवठा आणि अत्यावश्यक सेवा बाधीत झाल्या आहेत.

दरम्यान, वादळग्रस्त श्रीलंकेच्या मदतीसाठी भारतानं ऑपरेशन सागर बंधू ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहीमेअंतर्गत वैद्यकीय मदतीचा ८० टन साठा घेऊन एक विशेष विमान श्रीलंकेला पोहोचलं, **तर आणखी एक विमान लवकरच पोहचेल.** त्याआधी

आयएनएस विक्रांत आणि आयएनएस उदयगिरी या भारतीय युद्धनौकांनी श्रीलंकेला मदत साहित्य पोहचवलं. भारतानं राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या ८० कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली दोन शोध आणि बचाव पथकं श्रीलंकेला पाठवली असल्याची माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी दिली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या नुकसानीबद्दल शोक व्यक्त केला असून, श्रीलंकेला सहकार्य करण्याची वचनबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली आहे.

आता हे चक्रीवादळ श्रीलंकेच्या उत्तरेला वायव्येकडे सरकत असून, यामुळे जोरदार पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्याचा इशाराही दिला गेला आहे.

**<><><><><>**

दितवाह चक्रीवादळ बंगालच्या उपसागरात नैऋत्यच्या दिशेने ताशी ८ किलोमीटर वेगानं पुढे सरकत आहे. उद्या पहाटेपर्यंत ते उत्तरकडे सरकून तामिळनाडूचा उत्तर भाग, पुदुच्चेरी, आणि आंध्र प्रदेशाच्या दक्षिण भागाजवळ पोहोचेल अशी शक्यता आहे.

दरम्यान या चक्रीवादळाच्या प्रभावामुळे तामिळनाडूतल्या हवाई आणि रेल्वे सेवा बाधीत झाल्याचं वृत्त आहे. मात्र जिवीतहानी झालेली नाही, असं तामीळनाडूचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री थिरू रामचंद्रन यांनी सांगितलं. बाधित शेती, बोटी आणि इतर वित्तहानीचे पंचनामे वादळ ओसरल्यावर केले जातील. नागरिकांनी घरातच राहावं असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

५६ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची काल एका रंगतदार सोहळ्यानं सांगता झाली. ऐकूया त्याबद्द्ल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून

\- **- होल्ड - व्हाईस कास्ट - -**

*(पणजीमधे गेले ९ दिवस चाललेला सोहळा रसिकांसाठी पर्वणी ठरला. दिग्दर्शन ॲश मेफेअर दिग्दर्शित, व्हिएतनामच्या स्किन ऑफ यूथ या चित्रपटानं या महोत्सवाचा मुकुटमणी असलेल्या सूवर्ण मयूर पुरस्कारावर आपलं नाव कोरलं.*

*गोंधळ या मराठी चित्रपटासाठी दिग्दर्शक संतोष डावखर यांनी सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकासाठीचा रौप्य मयूर पुरस्कार आपल्या नावे केला, अभिनयाच्या श्रेणीत, कोलंबियन अभिनेता उबेमर रिओस यांना ए पोएट मधील भूमिकेसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेतेच्या, तर*

*स्लोव्हेनियन चित्रपट लिटल ट्रबल गर्ल्स मधील भूमिकेसाठी जारा सोफिजा ओस्टान यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून गौरवलं गेलं.*

*माय फादर्स शॅडो या नायजेरियन चित्रपटानं विशेष ज्युरी पुरस्कार मिळवला, तर सेफ हाऊस या नॉर्वेजियन चित्रपटानं प्रतिष्ठेचं ICFT-UNESCO गांधी पदक आपल्या नावे केलं. ओटीटी व्यासपीठाअंतर्गत बंडिश बँडिट्स सिझन टू ही सर्वोकृष्ट वेब मालिका ठरली, तर भारतीय चित्रपटांसाठी सर्वोत्कृष्ट पदार्पणीय दिग्दर्शक म्हणून केसरी चॅप्टर टू चे दिग्दर्शक करण सिंग त्यागी यांची निवड झाली.*

*या समारोप सोहळ्याचं विशेष आकर्षण ठरलं ते चित्रपटसृष्टीतील ५० वर्षांची कारकीर्द पूर्ण केल्याबद्दल सुपरस्टार रजनीकांत यांना प्रदान करण्यात आलेला जीवनगौरव पुरस्कार. आपल्याला १०० वर्षांनंतरही अभिनेता रजनीकांत म्हणूनच जन्माला यायला आवडेल अशी भावना रजनीकांत यांनी व्यक्त केली.*

*दिवंगत अभिनेते धर्मेंद्र यांच्यासह सिने आणि कला क्षेत्रातील असंख्य भारतीय कलाकारांना महोत्सवात स्मरणांजली वाहिली गेली.*

*याशिवाय सोहळ्याच्या प्रारंभीचा दिव्यांग व्यक्तींचा कलाविष्कार आणि इतर सादरीकरणं ही सिनेरसिकांसाठी पर्वणीच ठरली.*

*एकूणात हा सोहळा भारतीय चित्रपटसृष्टीतील कला आणि तंत्रज्ञानाचा गौरव करणारा आणि त्याचवेळी सिने जगताच्या नव्या वाटचालीची उमेद जागवणारा ठरला.)*

**<><><><><>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री श्रीप्रकाश जायस्वाल यांचं काल रात्री कानपूरमधे हृदयविकारानं निधन झालं. ते ८१ वर्षांचे होते. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातल्या मंत्रिमंडळात त्यांनी गृह खात्याचं राज्यमंत्रिपद तसंच कोळसा विभागाचं मंत्रिपद भूषवलं होतं. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि इतर पदाधिकाऱ्यांनी जायस्वाल यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनीही दिवंगत जायस्वाल यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं असून आदरांजली वाहिली आहे.

**//<><><><><>//**